# स्वामी रामानंद तीर्थ , मराठवाडा विद्यापीठ , नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत " इतिहास " विषयातील पीएच .डी . (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंधाचा स्थूल आराखडा

( Synopsis )

संशोधनाचा विषय

## रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले : एक रचनात्मक - स्थापत्यशास्त्रीय अभ्यास

संशोधक विद्यार्थी

**प्रा . नागोराव मधुकर तारू**

इतिहास विभाग

के . एम . सी . महाविद्यालय , खोपोली

ता. खालापूर , जि . रायगड

संशोधन मार्गदर्शक

**डॉ . विठ्ठलराव घुले**

प्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय , परभणी

ता . , जि . परभणी

**प्रास्ताविक :-**

इतिहास हे साधनांच्या दयेवर चालणारे शास्त्र आहे . म्हणून इतिहास लेखानशास्त्रात जेवढे लिखित साधनांना महत्त्व आहे , तेवढेच पुरातत्त्वीय साधनांना आहे . ज्यात शिलालेख , ताम्रपट , नाणी , किल्ले , लेणी , मंदिरे इत्यादींचा समावेश होतो . अशी साधने महाराष्ट्र राज्याच्या रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहेत .

या साधनांचा अभ्यास करता ; असे दिसते की , रायगड जिल्ह्याला इतिहासाची फार मोठी परंपरा लाभलेली आहे . या जिल्ह्याचा प्राचीन काळ अश्म युगापासून सुरु होतो . पुढे मौर्य , सातवाहन , क्षत्रप , चालुक्य , राष्ट्रकुट , शिलाहार इत्यादी घराण्यांनी राज्य केल्याचा उल्लेख मिळतो . मध्ययुगात देवगिरीच्या अस्तानंतर सुलतानी मुस्लीम राजवटीनी, विजयनगरच्या राजांनी व बहामनी सुलतानांनी राज्य केल्याचा उल्लेख मिळतो.

या जिल्ह्याला इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान मिळाले; ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तबगारीने . आदिलशाही, मुघल, सिद्दी इत्यादी शत्रूंशी लढा देऊन त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली . त्या स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला याच जिल्ह्याच्या महाड तालुक्यात आहे . सुधागड तालुक्याचे वैभव सांगणारा सुधागड किल्ला याच जिल्ह्यात आहे . आरमाराचे वैभव सांगणारा कुलाबा किल्ला याच जिल्ह्यात आहे . असे स्वराज्याला आधार देणारे एकूण लहान – मोठे ५५ किल्ले या जिल्ह्यात आहेत . याशिवाय या जिल्ह्यात नेणवली लेणी , घारापुरी लेणी, कोंढाणे लेणी इत्यदी लेण्या व बल्लाळेश्वरचे मंदिर , महडच्या गणपतीचे मंदिर इत्यादी मंदिरेही आहेत; जी या जिल्ह्याचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा वारसा सांगतात.

स. १८१८ ला पेशवाईचा अंत झाला. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रावर ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाली. तेव्हा हा जिल्हाही त्यांच्या ताब्यात आपोआप गेला. पुढे ब्रिटिशांनी स्वतंत्र कुलाबा जिल्ह्याची निर्मिती केली . पुढे जेव्हा ए. आर. अंतुले महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले, तेव्हा त्यांनी या

जिल्ह्याचे नामांतर करून “ रायगड जिल्हा ” असे नाव ठेवले . असा हा रायगड जिल्ह्याचा ऐतिहासिक धावता आढावा आपणाला सांगता येतो . त्याचे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे रायगड जिल्ह्यातील लिखित व पुरातत्त्वीय साधनांची उपलब्धता होय .

या जिल्ह्याच्या विविध क्षेत्रावर संशोधन झाले .विशेषत: पुरातत्त्वीय क्षेत्राचा अभ्यास करता लेणी , मंदिरे इत्यादी स्थापत्यावर संशोधन होत असताना दिसते . पण किल्ले या स्थापत्यावर रचनात्मक – स्थापत्यशास्त्रीय दृष्टीकोनातून कोणी अभ्यास केलेला नाही . तेव्हा हा दृष्टिकोन संशोधनात यावा याच एकमेव उद्देश्याने प्रस्तुत संशोधनाचा विषय घेतला आहे .

चिं . ग . गोगटे , गो . नी . दांडेकर , वा . सी . बेंद्रे ,स . आ . जोगळेकर, शां. वि. आवळसकर, डॉ. प्र. न. देशपांडे , डॉ .वि . गो . खोबरेकर , अ . रा . कुलकर्णी , प्र . के . घाणेकर इत्यादी अभ्यासकांनी दुर्गांचा अभ्यास करून विविध बाजूवर प्रकाश टाकला . त्याच्याही पुढे जाऊन रायगड जिल्ह्यातील दुर्गावर सखोल संशोधन मी करणार आहे . हा विषय निवडण्यासाठी मला माझे मार्गदर्शक डॉ . विठ्ठलराव घुले यांनी मार्गदर्शन केले आहे . व पुढेही सदोदित मार्गदर्शन करतील .

**संशोधन विषय निवडीचा उद्देश्य :-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्य – कर्तृत्त्वाने रायगड जिल्ह्याची भूमी पावन झाली. त्यांचे यश गड – दुर्गांत लपलेले होते . दुर्गांच्या वास्तुशास्त्रात लपलेले होते. किल्ले ताब्यात नसते तर शिवाजी महाराजांना आपल्या स्वराज्याचा पसारा मांडता आला नसता . स्वराज्याचे सार ते दुर्ग हे त्यांचे तत्त्व होते . या तत्त्वाचा अभ्यास करत करत चिं . ग. गोगटे , गो . नी . दांडेकर, प्र. के. घाणेकर इत्यादी अभ्यासकांनी बराचसा इतिहास सांगितला. त्यावर सविस्तर व विस्ताराने संशोधन होणे गरजेचे आहे त्या उद्देश्याने मी

किल्ल्यांचा रचनात्मक – स्थापत्यशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी हा संशोधनाचा विषय निवडला आहे

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

प्रस्तुत संशोधन विषयाचे विविधांगी महत्त्व आहे. पाहिली मुख्य गोष्ट म्हणजे या संशोधन विषयातून किल्लेशास्त्राची महती स्पष्ट होते. शिलालेख, नाणी, लेणी, ताम्रपट, मंदिरे,किल्ले ही इतिहासाची पुरातत्त्वीय साधने होत.या प्रत्येक साधनावर जेव्हा अभ्यासकांनी सखोल अभ्यास केला, तेव्हा स्वतंत्र शास्त्राचा उदय झाला आहे. उदा. शिलालेखाशास्त्र, नाणेशास्त्र, उत्खननशास्त्र, पुराभिलेखशास्त्र. अगदी त्याप्रमाणे किल्ल्यांचा जेव्हा भरपूर अभ्यास केला गेला, तेव्हा किल्लेशास्त्राचाही उदय झाला ; उदय व विकास या संशोधन विषयातून होतो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, प्रस्तुत संशोधन विषयातून रचनात्मक – स्थापत्यकलेची माहिती होते. रायगड जिल्ह्यात गिरीदुर्ग व जलदुर्ग – सागरी किल्ले मोठ्या प्रमाणावर आहेत. या स्थापत्य निर्मितीची एक विशिष्ट कला आहे ; ती येथे स्पष्ट होते. वर्तमान परिस्थितीत निर्माण केलेल्या वास्तू अल्पकालीन आहेत. परंतु शेकडो वर्षापूर्वी निर्माण केलेले किल्ले मात्र आजही टिकून आहेत. याचे कारण यापाठीमागे असलेली रचनात्मक – स्थापत्यकला आहे,ती या संशोधन विषयातून व्यक्त होते.

तिसरी महत्त्वपूर्ण गोष्ट म्हणजे या संशोधन विषयातून गतकालीन संरक्षणशास्त्राची माहिती होते. रायगड जिल्ह्यात मलंगगड, चंदेरी, प्रबळगड, कर्नाळा,भिवगड,द्रोणगिरी, रतनगड,मिरगड,रामदरणे यासारखे किल्ले उंच-उंच डोंगरावर वसलेले आहेत,तर उंदेरी, थळ, सर्जेकोट, कुलाबा, राजकोट,रेवदंडा, कोर्लई, पद्मदुर्ग यासारखे काही किल्ले समुद्रात तर काही किल्ले काठावर वसलेले आहेत. प्रत्येक प्रकारच्या किल्ल्याने आपले संरक्षणाचे

वैशिष्ट्ये जपलेले आहे. आणि गतकालीन मानवाचे शत्रूपासून संरक्षण केलेले आहे. ते संरक्षण कसे केले,ते या विषयातून अभिव्यक्त होते.

याशिवाय प्रस्तुत संशोधन विषयाचे राजकीय, व्यापारी दृष्टिकोनातुनही महत्त्व आहे. इतिहासलेखन शास्त्रातील प्रादेशिक – स्थानिक इतिहासाचीही संकल्पना येथे स्पष्ट होते. व रायगड जिल्ह्याचे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक आगळेवेगळे स्थान स्पष्ट होते.

**संशोधन विषयाची व्याप्ती :-**

प्रस्तुत संशोधन विषय हा महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांपुरता मर्यादित आहे . रायगड जिल्ह्यात एकूण ५५ किल्ले आहेत . त्यापैकी बहुतांश किल्ले हे गिरीदुर्ग आहेत . काही प्रमाणात जलदुर्ग – सागरी किल्ले आहेत . तर किरकोळ प्रमाणात भुईकोट किल्ले आहेत . या सर्व किल्ल्यांचा रचनात्मक – स्थापत्यशास्त्रीय अभ्यास अभिप्रेत आहे . या जिल्ह्यातील किल्ल्याचे ठिकाण सोडून इतर ठिकाणी असणाऱ्या लेणी अथवा मंदिरांचा अभ्यास येथे केला जाणार नाही . परंतु किल्ल्यात अशा प्रकारची स्थापत्य असतील तर मात्र त्यांचा अभ्यास केला जाणार आहे . त्यापाठीमागाची प्रयोजने अभासली जाणार आहेत . संशोधनाची व्याप्ती निश्चित करून घेतल्यामुळे नेमके स्वरूप प्राप्त होणार आहे .

**गृहितके (अभ्युपगम / परिकल्पना ) :-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या प्रबंधासाठी खालील गृहितके गृहीत धरले आहेत .

१) इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी आवश्यक साधनांपैकी किल्ले हे एक प्रमुख साधन आहे .
२) किल्ले हे मुलत: संरक्षणात्मक स्थापत्य होय. त्यांची उभारणी मुळात संरक्षणासाठी केली जात होती. म्हणून ते त्याचे प्रतीक आहे.

३) संरक्षणात्मक प्रयोजानातूनच रचनात्मक स्थापत्यांची निर्मिती होत होती.
४) किल्ल्यांवर वेगवेगळया प्रयोजानातून वेगवेगळया वास्तू आकार घेत होत्या, त्याप्रमाणे वेगवेगळे दृष्टिकोनही जन्म घेत होते. त्यामुळे आज इतिहासाला वेगवेगळे आयाम प्राप्त झाले आहेत.
५) आजच्या संरक्षणात्मक वास्तू आणि गतकाळातल्या संरक्षणात्मक वास्तू यांतील फरक " किल्ले " या स्थापत्यामुळे काढता येतो. त्यांच्या अधोगतीचा व प्रगतीचा आलेख काढता येतो.
६) या सर्व वैचारिक मंथनातूनच " किल्लेशास्त्र " या शास्त्राचा उदय झाला.
७) रायगड जिल्ह्यातील किल्ले या शास्त्रास पूरक आहेत .
रचनात्मक – स्थापत्यशैली स्पष्ट करतात .

**संशोधन – तथ्य संकलनाच्या पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी इतिहासलेखन शास्त्रात प्रचिलित असणाऱ्या "ऐतिहासिक व पुरातत्त्वीय" संशोधन पद्धती वापरण्यात येतील . या संशोधनाचे तथ्य संकलन करण्यासाठी सर्वेक्षण, प्रश्नावली, मुलाखत , संदर्भ , निरीक्षण, अनुसूची इत्यादी संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व पद्धतींचा वापर करण्यात येईल .

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:-**

प्रस्तुत संशोधनाची काही उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात .

१) रायगड जिल्ह्यातील किल्ल्यांचा रचनात्मक – स्थापत्यशास्त्रीय अभ्यास करणे
२) प्रादेशिक – स्थानिक इतिहास स्पष्ट करणे

३) किल्लेशास्त्राच्या आधाराने प्राचीन – मध्ययुगीन रायगड जिल्ह्याचा संरक्षणात्मक अभ्यास करणे
४) रायगड जिल्ह्याच्या इतिहासात नव्याने भर घालणे
५) रायगड जिल्ह्याचे महाराष्ट्राच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण स्थान निर्माण करणे

**प्रकरणे - शोध प्रबंधाचे अंतरंग**

**प्रकरण पहिले : पार्श्वभूमी**

प्रस्तुत प्रकरणात किल्ल्याचा अर्थ , किल्ल्यांचे विविध संदर्भ किल्ल्यांचा उदय व विकास,किल्ल्यांचे महत्त्व,किल्ल्यांचे प्रकार,किल्ल्यांवर झालेले पूर्वसंशोधन इत्यादी अन्य आणखी काही यासारख्या संकल्पनांचा अभ्यास केला जाईल.

**प्रकरण दुसरे : रायगड जिल्ह्यातील किल्ले**

प्रस्तुत प्रकरणात तालुकानिहाय किल्ल्यांची माहिती दिली जाईल ; ज्यात किल्ल्याचा निर्माता, किल्ल्याचे भौगोलिक स्थान, त्याची व्याप्ती थोडक्यात राजकीय इतिहास , किल्ल्याचा प्रकार ,किल्ल्याचे महत्त्व इ. अन्य आणखी काही मुद्यांचा समावेश असेल .

**प्रकरण तिसरे : किल्ल्यांतील संरक्षणात्मक स्थापत्य**

प्रस्तुत प्रकरणात किल्ल्यांचे तट , बुरुज ,चिलखत , खंदक इ. म्हणजे संरक्षणात्मक जे कोणते स्थापत्य असतील , त्यांचा आभास केला जाईल .

**प्रकरण चौथे : किल्ल्यांतील धार्मिक स्थापत्य**

प्रस्तुत प्रकरणात किल्ल्यांतील मंदिरे ,मश्जीदी , कबरी समाध्या , लेण्या इत्यादी अन्य आणखी काही जे कोणते धर्मदाय स्थापत्य असतील त्यांचा अभ्यास केला जाईल .

**प्रकरण पाचवे : किल्ल्यांतील इतर स्थापत्य**

प्रस्तुत प्रकरणात दरबार महल, राणीचा महल, अंबरखाना , ,कैदखाना इत्यादी अन्य आणखी काही अशा प्रकारच्या स्थापत्यांचा अभ्यास केला जाईल .

**प्रकरण सहावे : समारोप व निष्कर्ष**

प्रस्तुत प्रकरणात प्रत्येक प्रकरणातून सारांश – समारोप घेण्यात येईल . आणि संबंध संशोधनातून जे ठोस निष्कर्ष समोर येतील , ते सविस्तरपणे मांडण्यात येतील. शोध प्रबंधात शेवटी संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट्ये देण्यात येतील.

**संदर्भ सूची**


| अ.क्र. | ग्रंथ कर्ता / संपादक | ग्रंथ | प्रकाशन |
|---|---|---|---|
| १ | डॉ .कि. का. चौधरी | रायगड जिल्ह्याचे गॅझेटीयर | मुंबई दर्शनिका विभाग ,महाराष्ट्र शासन मुंबई |
| २ | चिं .गं . गोगटे | महाराष्ट्र देशातील किल्ले : भाग एक | महाराष्ट्र कोश मंडळ , लि . पुणे |
| 3 | Ramesh Desai | Shivaji – The Last Great Fort Architect | Mharashtra Information Centre, Mumbai. |
| 4 | Begde Prabhakar | Forts & Palaces Of India | Sagar Publications, New Delhi |
| 5 | Kulkarni A. R . | Maharashtra In The Age Of Shivaji | Deshmukh Prakashan , Pune |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | Grant Duff | History Of Mrathas | ElibornClassic Series, Lon don |
| ७ | शां . वि . आवळसकर | रायगडाची जीवनकथा | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ ,मुंबई |
| ८ | गो . नी . दांडेकर | महाराष्ट्र दर्शन | मॅजेस्टीक बुक स्टॉल , मुंबई |
| ९ | गो . नी . दांडेकर | दुर्गभ्रमण गाथा | मॅजेस्टीक बुक स्टॉल , मुंबई |
| १० | सेतू माधवराव पगडी | शिव चरित्र | नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली |
| ११ | ग . ह . खरे | दुर्ग | सह्याद्री विहार मंडळ, मुंबई |
| १२ | न . चि . केळकर व द. वि . आपटे | शिवकालीन पत्रसारसंग्रह | भारत इतिहास संशोधन मंडळ , पुणे |
| १३ | प्र . न . देशपांडे | रायगड दर्शन | पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये विभाग मुंबई |
| १४ | प्र . के . घाणेकर | “तो” रायगड | शिल्पा प्रकाशन ,पुणे |
| १५ | स . आ . जोगळेकर | सह्याद्री | शुभदा प्रकाशन , पुणे |
| १६ | प्र . के . घाणेकर | शिवरायांचे दुर्गविज्ञान | स्नेहल प्रकाशन ,पुणे |
| १७ | सतीश अक्कलकोट | दुर्ग : खंड पहिला | सह्याद्री दुर्गभ्रमण मंडळ, सांगली |
| १८ | लीला दीक्षित | कोकण : विविध दिशा आणि दर्शन | प्रतिमा प्रकाशन, पुणे |
| १९ | प्र .के . घाणेकर | भटकंती रायगड जिल्ह्याची | स्नेहल प्रकाशन, पुणे |
| २० | प्र .के . घाणेकर | जंजिरा | स्नेहल प्रकाशन, पुणे |
| २१ | श्रीनिवास घैसास | समग्र कोकण दर्शन | मनोरमा प्रकाशन , मुंबई |
| २२ | महेश तेंदडूलकर | सुरगड, सरसगड, | स्नेहल प्रकाशन , पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सुधागड | |
| २३ | प्र . के . घाणेकर | गड आणि कोट | स्नेहल प्रकाशन , पुणे |
| २४ | द . ग. देशपांडे | महाराष्ट्रातील किल्ले | डायमंड प्रकाशन , पुणे |
| २५ | विजय आपटे | शोध महाराष्ट्राचा | राजहंस प्रकाशन , पुणे |
| २६ | जालिंदर चांदगुडे | आपला रायगड जिल्हा | प्राजक्त प्रकाशन , पुणे |
| २७ | के .के . शर्मा | संदर्भ महाराष्ट्र : खंड १ ते ५ | इंटेलेक्चुअल बुक ब्युरो , भोपाळ |
| २८ | प्र . के . घाणेकर | आडवाटेवरचा महाराष्ट्र | स्नेहल प्रकाशन , पुणे |
| २९ | वा . कृ . भावे | पेशवेकालीन महाराष्ट्र | वरदा प्रकाशन , पुणे |
| ३० | र . द . साठे | रायगडाची सहल | शिल्पा प्रकाशन ,पुणे |
| ३१ | श्रीनिवास गडकरी | रायगड जिल्ह्यातील इतिहास जपणारी गावं | बुकमार्क पब्लिकेशन, पुणे |
| ३२ | रा . श्री . मोरवंचीकर | सातवाहनकालीन महाराष्ट्र | प्रतिमा प्रकाशन , पुणे |
| ३३ | श्रीनिवास गडकरी | निसर्गसुंदर रोहा | बुकमार्क पब्लिकेशन , पुणे |
| ३४ | गीता हरवंदे | पेण | ग्रंथाली प्रकाशन , मुंबई |
| ३५ | प्र . के घाणेकर | इये महाराष्ट्र देशी | स्नेहल प्रकाशन , पुणे |
| ३६ | म . के . ढवळीकर | महाराष्ट्राची कुळकथा | राजहंस प्रकाशन , पुणे |
| ३७ | स्मरणिका | रायगड जिल्ह्यातील इतिहासाच्या पाऊलखुणा | सी. के. टी. कॉलेज , पनवेल |
| ३८ | स्मरणिका | सुधागड दर्शन | एस . व्ही . कमर्शिएल डिझायनर , माणगाव |
| ३९ | स्मरणिका | जांभूळपाडा, सुधागड , रायगड | सिद्धिविनायक मंडळ , जांभूळपाडा |
| ४० | म . श्री . माटे | मराठेशाहीचे वास्तूशिल्प | कॉटिनेन्टल प्रकाशन ,पुणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | जिल्हा मार्गदर्शिका | रायगड जिल्हा : ऐतिहासिक जिल्हाविशेष माहिती | चक्रपाणी प्रकाशन ,पुणे |
| ४२ | प्र के . घाणेकर | दुर्गेश्वर रायगड | स्नेहल प्रकाशन , पुणे |
| ४३ | अप्पासाहेब परब | रायगड स्थळदर्शन | दुर्गसृष्टी प्रकाशन , मुंबई |
| ४४ | के . सी . ठाकरे | रायगड – यात्रा , दर्शन ,माहिती | निर्णयसागर प्रेस , मुंबई |
| ४५ | र . शि .लोहोकरे | रायगड | रायगड दर्शन प्रतिष्ठान,पुणे |
| ४६ | प्रभाकर भावे | राजधानी रायगड | वरदा प्रकाशन , पुणे |


संशोधक

**प्रा . नागोराव मधुकर तारू**

इतिहास विभाग

के. एम. सी. महाविद्यालय , खोपोली

ता. खालापूर , जि . रायगड

मार्गदर्शक

**डॉ . विठ्ठलराव घुले**

प्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय , परभणी

ता . , जि . परभणी